वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे

महाराष्ट्र शासन

# विभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद यांचे कार्यालय

मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, गाळा क्र. 39, उस्मानाबाद-413501

दुरध्वनी क्रमांक☎ 223408/ 223907 (02472)
Email dfoosmanabad@gmail.com

पत्र

विषय- Proposal for diversion of 5.8535 Ha Forest Area (2.8943) Ha in Osmanabad Forest Division ) for proposed Greenfield Railway line between Solapur-Tuljapur-Osmanabad (Total Length of 84.439 Km) passing through Solapur and Osmanabad district in the State of Maharashtra.

जा.क्र.अ/ वसंअ/ 3266 /2022-23.
उस्मानाबाद.413501. दिनांक 01 /12/2022.

प्रति,
उप मुख्य अभियंता (निर्माण)
मध्य रेल सोलापुर
जि.सोलापुर

संदर्भ- 1.उप मुख्य अभियंता (निर्माण) मध्य रेल भुसावळ यांचेकडील पत्र क्रमांक Dy.CE/(C)BSL-II/ DO/SUR-UMD/LA/दिनांक 21.07.2022
2.या कार्यालयाचे पत्र क्रमांक अ/वसंअ/1891/2022-23/दिनांक 22/08/2022.
3. उप मुख्य अभियंता (निर्माण) मध्य रेल सोलापुर यांचेकडील पत्र क्रमांक Land/Acq/ GIB / Pune/1/दिनांक 06.10.2022.
4.या कार्यालयाचे पत्र क्रमांक अ/वसंअ/2548/2022-23/दिनांक 11/10/2022.
5.उप मुख्य अभियंता (निर्माण) मध्य रेल सोलापुर यांचेकडील पत्र क्रमांक SUR/C/SUR-UMD New Line/Forest/1/ दिनांक 22.11.2022.

उपरोक्त विषयास अनुसरुन उप मुख्य अभियंता (निर्माण) मध्य रेल भुसावळ यांचेकडुन सोलापुर-तुळजापुर-उस्मानाबाद रेल्वे प्रकल्पासाठी तुळजापुर तालुक्यातील 2.8943 हेक्टर वनजमीन भारतीय वन संवर्धन अधिनियम 1980 अंतर्गत वनजमीन मागणी प्रस्तावास या कार्यालयास प्राप्त झाला होता. प्राप्त प्रस्तावाचे अवलोकन करुन संदर्भिय पत्र क्रमांक 2 व 4अन्वये प्रस्तावात त्रुटी काढुण ऑनलाईन व ऑफलाईन प्रस्ताव परत करणेत आला होता.

वरील संदिर्भय पत्र क्रमांक 5 अन्वये उप मुख्य अभियंता (निर्माण) मध्य रेल सोलापुर यांचेकडुन सदरील त्रुटीची पुर्तता करुन एक प्रतीत प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झाला आहे. सदरील प्रस्तावाचे अवलोकन केले असता सादर करणेत आलेल्या प्रस्तावामध्ये पुन्हा खालील प्रमाणे त्रुटी आढळुण आलेल्या आहेत.

1. प्रस्तावित रेल्वे प्रकल्पाची लाईन ही उस्मानाबाद जिल्हयातील वन्यजिव अभयारण्या पासुनचे किती अंतरावरून जात आहे त्या बाबत Toposheet, गाव नकाशावर दर्शवुन जियो रेफरन्स नकाशा व सॅटेलाईट इमेजरी नकाशावर मार्क करुन सादर करणे बाबत कळविणेत आले होते परंतु येडशी वन्यजिव अभयारण्या पासुन किती अंतरावरून जात आहे त्याबाबतच Topo sheet, गाव नकाशावर दर्शवुन जियो रेफरन्स नकाशा व सॅटेलाईट इमेजरी नकाशा प्राप्त झाला आहे. **परंतु गंगेवाडी माळढोक पक्षी अभयारण्या पासुन रेल्वे प्रकल्पाची लाईन ही किती अंतरावरून जात आहे. त्या बाबत Toposheet, गाव नकाशावर दर्शवुन जियो रेफरन्स नकाशा व सॅटेलाईट इमेजरी नकाशावर मार्क करुन सादर करणेत आलेले नाहीत.**
2. प्रस्तावा संबंधित सर्व माहिती प्रमाणपत्रे व सर्व नकाशे, जियो रेफरन्समध्ये सॉफ्ट कॉपीसह सीडीमध्ये परिपुर्ण सादर केलेले दिसुन येत नाही.
3.सदर रेल्वे प्रकल्पासाठी Privesh प्रणालीवर वनजमीन वळतीकरण होत असलेले क्षेत्राचे KML फाईलवर वन जमीन वळतीकरण क्षेत्र 2.8943 हे दिसुन येते. परंतु Nodal Cell प्रणालीवर 4.9689 हे. आर क्षेत्र आवश्यक असल्याचे नमुद आहे. सदर तफावती बाबत अर्थबोध होत नाही.

4.प्रस्तावित रेल्वे प्रकल्पासाठी बाधित होत असलेल्या वनक्षेत्राच्या बदल्यात पर्यायी वनीकरणासाठी दुप्पट अवनत क्षेत्र उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

5. प्रस्तावित रेल्वे प्रकल्पाच्या अनुषंगाने बाधीत होत असलेल्या क्षेत्राच्या बदल्यात पर्यायी वनीकरणासाठी उपलब्ध करुन देण्यात येणा-या क्षेत्राचे जसे की, गाव नकाशा सर्व्हे ऑफ इंडिया कडील टोपो शिट, सॅटेलाईट इमेजरी व KML फाईलसह सॉफट व हार्ड कॉपीसह सादर करणे बंधनकारक आहे.

6. तसेच या कार्यालयास सादर करणेत आलेला प्रस्ताव हा एकच प्रतीत सादर करण्यात आलेला आहे. परिपुर्ण प्रस्ताव 7 प्रतीत सॉफट व हार्ड कॉपीत सीडीसह या कार्यालयास सादर करावा.

उपरोक्त नमुद 1 ते 6 त्रुटीची पुर्तता करुन परिपुर्ण प्रस्ताव या कार्यालयास सादर करणेत यावा जेणेकरुन या कार्यालयाकडुन पुढील आवश्यक ती कार्यवाही करणे सोईचे होईल. सदरील मुळ प्रस्ताव हा अपुर्ण व एकच प्रतीत असल्याने यासोबत ऑनलाईन व ऑफलाईन परत करणेत येत आहे.

सहपत्र-वरील प्रमाणे.

VBlambe

(श्रीमती.वृषाली बी.तांबे )
विभागीय वन अधिकारी
उस्मानाबाद.

प्रतिलिपी -मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केद्रस्थ अधिकारी म.रा.नागपुर यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रतिलिपी -मा.मुख्य वनसंरक्षक (प्रा.) वनवृत्त औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रत-वनपरिक्षेत्र अधिकारी लातुर/वि.का.लातुर/अहमदपुर/तुळजापुर/भुम/उमरगा यांना देवुन कळविणेत येते की, सोलापुर-तुळजापुर-उस्मानाबाद रेल्वे प्रकल्पासाठी तुळजापुर तालुक्यातील 2.8943 हेक्टर वनजमीन मागणी प्रस्तावास या कार्यालयास प्राप्त झाला आहे. त्याअनुषंगाने प्रस्तावित रेल्वे प्रकल्पात बाधित होत असलेल्या वनक्षेत्राच्या बदल्यात पर्यायी वनीकरणासाठी दुप्पट अवनत क्षेत्र आपले वन परिक्षेत्रात उपलब्ध असल्यास त्या बाबतची (Suitability Certificate ) सह माहिती तात्काळ या कार्यालयास सादर करावी.जणेकरुन सदरचा प्रस्ताव वरीष्ठ कार्यालयास सादर करणे सोईचे होईल.